# मुंबई विद्यापीठ

## अधिसूचना

क.नि.वि./(अधिसभा)२५(२)(आर)/348/२०१५.

मुंबई विद्यापीठाच्या पदवीधरांना या अधिसुचनेव्दारे असे कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांचे बळकटीकरण करण्याच्या दृष्टीने आणि त्यांना उच्च शिक्षणाच्या व संशोधनाच्या दर्जात सुधारणा करणे शक्य व्हावे म्हणून महाराष्ट्र शासनाला, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ निरसित करणे आणि राज्यातील सर्व कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांसाठी एक सर्वसमावेशक कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे.

या संदर्भात महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार, वर्ष १ अंक ३१ (५), दिनांक १७ ऑगस्ट २०१५चा महाराष्ट्र अधिनियम क्र. -२९ नुसार सर्व संबधिताना कळविण्यात येते कि, सन २०१५ मध्ये घेण्यात येणा-या मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवरील दहा नोंदणीकृत पदवीधर सदस्यांच्या निवडणुकांची सुरू करण्यात आलेली नावनोंदणी प्रक्रिया (ऑनलाइन/ऑफलाइन) वरिल अधिनियमानुसार तात्काळ थांबविण्यात येत असून **दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६** पर्यत कोणत्याही निवडणूका घेण्यात येणार नाहीत. याची कृपया नोंद घेण्यात यावी.

सन २०१५ चे महाराष्ट्र अधिनियम क्र. २९ विद्यापीठाच्या www.mu.ac.in/election या संकेत स्थळी उपलब्ध आहे.

मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - 26ऑगस्ट, २०१५.

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव

-------------

क.नि.वि./348/२०१५. मुंबई - ४०० ०३२. दिनांक - 26ऑगस्ट, २०१५.

प्रत माहितीकरिता अग्रेषित :-

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभागप्रमुख,
प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये व
सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,
कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख,
उपकुलसचिव (वित्त व लेखा), परीक्षा भवन, विद्यानगरी,
उपकुलसचिव (वित्त व लेखा), फोर्ट,
सहायक कुलसचिव (रत्नागिरी उपकेंद्र), रत्नागिरी,
सर्व वर्तमानपत्रांचे संपादक यांना विनामुल्य जाहिरातीद्वारे प्रसिध्दी देण्यासाठी.

मुंबई - ४०० ०३२.

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव

टिप :- १) कायदेशीर अर्थासाठी इंग्रजी कायद्याचा/परिपत्रकाचा संदर्भ पहावा.

RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १, अंक ३१(५)] सोमवार, ऑगस्ट १७, २०१५/श्रावण २६, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ४९

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.**—महाराष्ट्र राज्यातील विवक्षित कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांमधील प्राधिकरणे व मंडळे यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम . . | पृष्ठे १-२ |

दिनांक १४ ऑगस्ट २०१५ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**नि. ज. जमादार,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **" महाराष्ट्र शासन राजपत्रात "** दिनांक १७ ऑगस्ट २०१५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यातील विवक्षित कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांमधील प्राधिकरणे व मंडळे यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

१९९४ चा महा. ३५. **ज्याअर्थी,** महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ यामध्ये इतर गोष्टींबरोबरच, विवक्षित कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांची निवडून दिलेल्या सदस्यांचा समावेश असलेली निरनिराळी प्राधिकरणे व मंडळे स्थापन करण्यासाठी तरतूद आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांचे बळकटीकरण करण्याच्या दृष्टीने आणि त्याना उच्च शिक्षणाच्या व संशोधनाच्या दर्जात सुधारणा करणे शक्य व्हावे म्हणून महाराष्ट्र शासनाला,
१९९४ चा महा. ३५. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ निरसित करणे आणि राज्यातील सर्व कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांसाठी एक सर्वसमावेशक कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे, असे वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** असे अपेक्षित आहे की, याबाबतीत नवीन अधिनियम अधिनियमित करण्यासाठीचे विधेयक नजीकच्या भविष्यकाळात राज्य विधानमंडळात मांडले जाईल ;

**आणि ज्याअर्थी,** नवीन अधिनियमाच्या तरतुदींनुसार विद्यापीठाची निरनिराळी प्राधिकरणे व मंडळे स्थापन करण्याची आवश्यकता राहणार आहे ;

**आणि ज्याअर्थी,** काही विद्यापीठांच्या प्राधिकरणाच्या व मंडळांच्या सदस्यांचा पदावधी हा, ३१ ऑगस्ट २०१५ रोजी समाप्त होणार आहे ;

**आणि ज्याअर्थी,** अशा प्रत्येक विद्यापीठाची प्राधिकरणे व मंडळे यामधील निवडून आलेल्या सदस्यांची रिक्त पदे भरण्यासाठी घ्यावयाच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** वर नमूद केलेल्या प्रयोजनांसाठी अशा विद्यापीठांची प्राधिकरणे व मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे) अधिनियम, २०१५, असे म्हणावे.

विद्यापीठाची प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे.

**२.** महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " विद्यापीठ अधिनियम " असा करण्यात आला आहे) किंवा त्याखाली केलेले कोणतेही परिनियम यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विद्यापीठ अधिनियमाच्या अनुसूचीत उल्लेख केलेल्या कोणत्याही विद्यापीठात, त्या विद्यापीठाचे कोणतेही प्राधिकरण किंवा कोणतेही मंडळ याच्या कोणत्याही निवडून आलेल्या सदस्यांचे रिक्त पद-मग ते कोणत्याही रीतीने रिक्त झालेले असो-भरण्यासाठी ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत (या अधिनियमात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त कालावधी " असा करण्यात आला आहे) कोणत्याही निवडणुका घेण्यात येणार नाहीत.

१९९४ चा महा. ३५.

विद्यापीठाची प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याचे परिणाम.

**३.** विद्यापीठ अधिनियम किंवा त्याखाली केलेले कोणतेही परिनियम यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाने किंवा कोणत्याही इतर मंडळाने, उक्त कालावधीत केलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, अशा कोणत्याही प्राधिकरणात किंवा मंडळात निर्माण झालेली जी रिक्त पदे निवडणुकीद्वारे भरणे आवश्यक होते ती पदे तशी भरण्यात आली नाहीत केवळ याच कारणावरून अवैध ठरणार नाही.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.